## पिंपरी चिंचवड महानगरपालिका ,पिंपरी ४११०१८
## क्रीडा विभाग

### पिंपरी चिंचवड महानगरपालिका , "सावित्रीबाई फुले अकॅडमी (S.P.A.)" पिंपरी, SIAC, PITCS, YASHADA द्वारे देण्यात येणाऱ्या निशुल्क नागरीसेवा परीक्षा प्रशिक्षण २०२३ करिता प्रवेशासाठी सामायिक प्रवेश परीक्षेची अधिसूचना

केंद्रीय लोकसेवा आयोग (UPSC) मार्फत घेतल्या जाणा-या परीक्षांना बसणा-या विद्यार्थ्यांना नि:शुल्क मार्गदर्शन करणे या उद्देशाने पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या वतीने, ज्ञानज्योती सावित्रीबाई फुले स्मारक, पिंपरी ४११०१८ येथे सन २०२३ पासून नव्याने "सावित्रीबाई फुले अकॅडमी (S.P.A.)" सुरु करण्यात येत आहे.

संचालक, SIAC. मुंबई यांनी खालील प्रमाणे पिंपरी चिंचवड महानगरपालिका , "सावित्रीबाई फुले अकॅडमी (S.P.A.)" पिंपरी १८ SIAC, PITCS, YASHADA आणि PCMC द्वारे देण्यात येणाऱ्या निशुल्क नागरीसेवा परीक्षा प्रशिक्षण २०२३ करिता प्रवेशासाठी सामायिक प्रवेश परीक्षेची अधिसूचना www.siac.org.in या संकेतस्थळावर व दि.४/११/२०२२ च्या राज्य विविध दैनिक वृत्तपत्रात प्रसिध्द केली आहे

महाराष्ट्र शासन उच्च व तंत्र शिक्षण विभागांतर्गत राज्य प्रशासकीय व्यवसाय शिक्षण संस्था (SIAC), मुंबई, भारतीय प्रशासकीय सेवा पूर्व प्रशिक्षण केंद्र, नाशिक, कोल्हापूर, औरंगाबाद, अमरावती व नागपूर, यशवंतराव चव्हाण विकास प्रशासन प्रबोधिनी (VASHADA) संचालित डॉ. आंबेडकर स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन केंद्र (एसीईसी), पुणे आणि पिंपरी चिंचवड महानगरपालिका (PCMC) संचालित सावित्रीबाई फुले अकॅडेमी, पिंपरी पुणे मार्फत केंद्रीय लोकसेवा आयोगाची नागरी सेवा पूर्व परीक्षा २०२३ साठी पूर्ण वेळ विनामूल्य प्रशिक्षण देण्याकरिता सामायिक प्रवेश परीक्षेचे आयोजन करण्यात आले असून इच्छुक पात्र उमेदवाराकडून ऑनलाईन पद्धतीने अर्ज मागविण्यात येत आहे.

प्रवेश प्रक्रियेचे वेळापत्रक:

| | | | |
|---|---|---|---|
| १ | ऑनलाईन अर्ज सुरुवात | शुक्रवार दि. ०४.११.२०२२ | सकाळी १०.०० पासून |
| २ | अर्ज भरण्याचा अंतिम दिनांक | शुक्रवार दि. २५.११.२०२२ | रात्री १२.०० पर्यंत |
| ३ | परीक्षा शुल्क भरण्याचा अंतिम दिनांक | शुक्रवार दि. २५.११.२०२२ | रात्री १२.०० पर्यंत |
| ४ | प्रवेश परीक्षा | रविवार दि. ०४.१२.२०२२ | सकाळी ११.०० ते दुपारी १.०० |

टीप-१)विद्यार्थ्यांचे प्रवेश लेखी परीक्षा आणि मुलाखतीतील कामगिरीच्या आधारे ठरवले जाणार असल्याने मुलाखतीचे वेळापत्रक परीक्षेनंतर जाहीर केले जाईल.

२)सामायिक प्रवेश परीक्षेचा निकाल जाहीर झाल्यानंतर, विद्यार्थ्यांनी ऑनलाईन प्रवेश पोर्टलवर लॉग-इन करून त्यांच्या पसंतीचे प्रशिक्षण केंद्र प्रवेशासाठी निवडावे.

३)प्रवेश प्रक्रियेबाबत विद्यार्थ्यांना कोणतीही माहिती वैयक्तिक रित्या उपलब्ध करून दिली जाणार नाही. प्रवेश प्रक्रियेबद्दलची सर्व माहितो SIAC च्या अधिकृत संकेतस्थळावर उपलब्ध करून दिली जाईल.

सविस्तर जाहिरात.परीक्षेचा अभ्यासक्रम, पात्रता, ऑनलाईन अर्ज भरण्याविषयी सूचना व इतर माहिती www.siac.org.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.अशी जाहिरात प्रसिध्द केली आहे .

दिनांक: ४/११/२०२२२
स्थळ: पिंपरी पुणे ४११०१८
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
क्रीडा विभाग
क्र. क्रीडा/७अ/कावि/५७८ /२०२२
दिनांक ४ /११ /२०२२

(जितेंद्र वाघ)
अतिरिक्त आयुक्त (२)
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी ४११०१८

सामायिक प्रवेश परीक्षा ,प्रवेश क्षमता